# ॲग्रोमेट ॲडवायझरी बुलेटीन

## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, कोल्हापूर

## विभागीय कृषि संशोधन केंद्र, शेंडा पार्क, कोल्हापूर

दूरध्वनी : (०२३१) २६९२४१६ ईमेल: adrkolhapur@rediffmail.com

### हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. १७.०४.२०२६

जिल्हा : सांगली

| मागील आठवड्यातील हवामान (११.०४.२०२६ ते १७.०४.२०२६) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामानाचा अंदाज (१८.०४.२०२६ ते २२.०४.२०२६) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | दिनांक | १८ | १९ | २० | २१ | २२ |
| - | - | - | - | - | - | - | पाऊस (मिमी) | १ | ३ | १० | ९ | ५ |
| - | - | - | - | - | - | - | कमाल तापमान (अं.से.) | ४० | ४० | ३९ | ३८ | ३८ |
| - | - | - | - | - | - | - | किमान तापमान (अं.से.) | २३ | २४ | २५ | २५ | २४ |
| - | - | - | - | - | - | - | ढग स्थिती (आकाश) | ५ | ३ | ३ | २ | २ |
| - | - | - | - | - | - | - | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ७९ | ८९ | ९५ | ९५ | ९५ |
| - | - | - | - | - | - | - | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | २६ | २७ | २९ | २९ | २९ |
| - | - | - | - | - | - | - | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | ९ | २२ | ११ | ७ | ५ |
| - | - | - | - | - | - | - | वाऱ्याची दिशा | उ.वा. | पू. | वा. | प.नै. | वा. |

### हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| पीक | अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश | | प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांचेकडून प्राप्त झालेल्या हवामान अंदाजानुसार सांगली जिल्ह्यामध्ये १८, १९ व २०एप्रिल रोजी आकाश अंशत: ढगाळ राहण्याची तसेच २१ व २२ एप्रिल रोजी आकाश मुख्यत: स्वच्छ राहण्याची शक्यता आहे. सांगली जिल्ह्यामध्ये १८, १९, २०, २१ व २२ एप्रिल रोजी तुरळक ठिकाणी हलक्या स्वरुपाच्या पावसाची शक्यता आहे. सांगली जिल्ह्यामध्ये २२ एप्रिल पर्यंत कमाल तापमान ३८.० ते ४०.० अंश सेल्सिअस दरम्यान राहण्याची तसेच किमान तापमान २३.० ते २५.० अंश सेल्सिअस या दरम्यान राहण्याची शक्यता आहे. सकाळची सापेक्ष आद्रता ७९ ते ९५%, दुपारची सापेक्ष आद्रता २६ ते २९% तसेच वाऱ्याचा वेग ताशी ९ ते २२ किमी या दरम्यान राहण्याची शक्यता आहे. |
| विस्तारित श्रेणी अंदाज | | विस्तारित श्रेणीच्या अंदाजानुसार मध्य महाराष्ट्रामध्ये दिनांक १२ ते १८ एप्रिल दरम्यान पावसाचे प्रमाण सरासरी पेक्षा कमी राहण्याची, कमाल तापमान सरासरी दरम्यान राहण्याची तसेच किमान तापमान सरासरी दरम्यान राहण्याची शक्यता आहे. |
| हवामान इशारा | १७ एप्रिल | ➢ सांगली जिल्ह्यामध्ये काही ठिकाणी उष्णतेची लाट येण्याची शक्यता आहे. |
| | १९ एप्रिल | ➢ सांगली जिल्ह्यामध्ये तुरळक ठिकाणी मेघगर्जना, विजांचा कडकडाट, व ताशी ४०-५० किमी वेगाच्या वाऱ्यासह हलक्या ते मध्यम पावसाची शक्यता आहे. |
| सामान्य सल्ला | | **शेतकरी बांधवांनी उष्णतेपासून बचावासाठी खालीलप्रमाणे काळजी घ्यावी**<br>➢ दुपारच्या उष्णतेत (१२ ते ४) शेतातील काम टाळावे<br>➢ हलके व सैल, कापसाचे कपडे परिधान करावेत<br>➢ डोक्यावर टोपी / गमछा वापरावा<br>➢ भरपूर पाणी, ताक किंवा लिंबूपाणी पिणे आवश्यक<br>➢ थेट उन्हात जास्त वेळ काम करू नये, मध्ये मध्ये विश्रांती घ्यावी<br>➢ उष्णतेमुळे चक्कर, डोकेदुखी, अशक्तपणा वाटल्यास लगेच सावलीत विश्रांती घ्यावी<br>➢ काम करताना शरीरावर पाणी शिंपडावे किंवा थंड पाण्याने चेहरा धुवावा<br>➢ मद्यपान टाळावे (उष्णतेचा परिणाम वाढतो)<br>➢ उष्ण व दमट हवामानात स्वतःची काळजी घेतल्यास उष्णतेचा ताण टाळता येतो.<br>❖ **किटकनाशक तसेच बुरशीनाशकाची फवारणी पावसाची उघडिप पाहून व वारा शांत असताना करावी** |
| संदेश | | शेतकरी बांधवांनी हवामान आधारित शेतीविषयक सल्ला आपल्या अँड्रॉइड मोबईलवर मिळविण्यासाठी गुगल प्ले स्टोअर वरून " मेघदूत" तर विजांच्या अंदाजासाठी "दामिनी" हे अँड्रॉइड ॲप्लिकेशन डाउनलोड करून वापरावे. |
| सुर्यफुल | पक्वता | ➢ पक्व झालेल्या सुर्यफुल पिकाची त्वरित काढणी करावी व काढणी केलेल्या शेतीमालाची सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी. |
| मका | वाढीची | ➢ उष्ण हवामानामुळे बाष्पोत्सर्जन वाढून पिकावर पाण्यचा ताण येऊ शकतो. त्यामुळे पिकाला पाण्याचा ताण येऊ देऊ नये<br>➢ जमिनीत ओलावा टिकवण्यासाठी विशेषतः सकाळी किंवा संध्याकाळी हलके पाणी द्यावे |
| टोमॅटो | वाढीची | ➢ तुरळक ठिकाणी जोरदार वाऱ्यासाह हलक्या पावसाची शक्यता असल्याने टोमॅटो झाडे उन्मळून पडू नयेत म्हणून टोमॅटो रोपांना बांबू/काठीच्या सहाय्याने आधार द्यावा. |

**दूरध्वनी : (०२३१) २६९२४१६** **ईमेल: adrkolhapur@rediffmail.com**

| | | |
|---|---|---|
| द्राक्ष | घड पक्वता | **काढ णीच्या अवस्थेतील द्राक्ष बाग व्यवस्थापनः**<br>➢ या अवस्थेत असलेल्या बागेला मण्यांची टवटवीत, रसाळ आणि आकर्षकता टिकवून ठेवण्यासाठी पुरेशा सिंचनाची अत्यंत गरज असते. अनेक द्राक्ष बागांमध्ये असे दिसून आले आहे की, शेतकरी वेलींना पाणी देणे टाळत आहेत. अशा बागांमधील मन्यांमध्ये साखरेचे प्रमाण लवकर वाढू शकते, परंतु 'घड सुकणे' ही एक मोठी समस्या निर्माण होऊ शकते. यामुळे वेलीची पाण्याची गरज आणि पुरवठा यांचा समतोल बिघडतो, परिणामी द्राक्षांचे मणी सुकून ते काळे पडणे म्हणजेच 'ममीफिकेशन' होण्याचा धोका वाढतो. उपाययोजनाः ही समस्या रोखण्यासाठी बागेला आवश्यकतेनुसार पुरेसे पाणी द्यावे. ज्या बागांमध्ये रंग भरण्याची किंवा पाणी उतरण्याची अवस्था नुकतीच सुरू झाली आहे, अशा बागेत कॅल्शियम आणि मॅग्नेशियमची पानांवर (फोलिअर) फवारणी केल्यास काही प्रमाणात फायदा होतो (स्त्रोत : एन.आर.सी. ग्रेप) |
| ऊस | वाढीची अवस्था | ➢ सुरु ऊस लागवडीस मोठ्या बांधणीच्या वेळी रासायनिक खतांची मात्रा नत्र १०० किलो (युरिया २१७ किलो), स्फुरद ५५ किलो (सिंगल सुपर फॉस्फेट ३४४ किलो) व पालाश ५५ किलो(म्युरेट ऑफ पोटॅश ९२ किलो) प्रती हेक्टरी याप्रमाणात द्यावी.<br>➢ पावसाची उघडीप पाहून खतांचा हप्ता द्यावा. |
| कांदा | पक्वता | ➢ पक्व झालेल्या कांदा पिकाची त्वरित काढणी करून घ्यावी व तयार शेतीमाल सुरक्षित ठिकणी ठेवावा .<br>➢ कांदा पिकाची काढणी केली असल्यास व त्वरित सुरक्षित ठिकाणी नेणे शक्य नसल्यास शेतामध्ये गोळा केलेले कांदे पॉलीथिन शीटने झाकावेत. |
| केळी | वाढीची | ➢ पावसाची शक्यता असल्याने पक्व झालेल्या/ काढणीस आलेल्या घडांची काढणी करावी व काढणी केलेले घड सुरक्षित ठिकाणी ठेवावेत<br>➢ पाऊस व जोरदार वाऱ्याने केळी झाडे उन्मळून पडू नयेत म्हणून फळझाडांना बांबू/काठीच्या सहाय्याने आधार द्यावा. |
| पशुधन | वाढीची | **जनावरांचे वाढणाऱ्या तापमानापासून संरक्षणासाठी पुढील उपाय करावेत...**<br>➢ म्हशींना घर्मग्रंथी खूप कमी असल्याने व त्यांची त्वचा काळी असल्याने वाढणाऱ्या तापमानाचा गायींपेक्षा म्हशींना त्रास जास्त होतो म्हणून म्हशींना पाण्यात डुंबन्यास सोडावे.<br>➢ जनावरे सावलीच्या ठिकाणी बांधावीत. शक्य असल्यास दिवसातून ४ ते ५ वेळा त्याच्या अंगावर पाणी फवारावे.<br>➢ शक्य असल्यास गोठ्यांमध्ये फॅन लावावेत<br>➢ जनावरांना पुरेशे, शुद्ध व थंड पाणी पिण्यास द्यावे. जनावरांना पुरेसा प्रथिनेयुक्त व हिरवा चारा आणि खनिजमिश्रण द्यावे.<br>➢ दुपारच्या वेळेस जनावरे चारावयास नेऊ नयेत. |
| पोल्ट्री पक्षी | वाढीची | पोल्ट्रीमधील पक्षांचे वाढणाऱ्या तापमानापासून संरक्षणासाठी पोल्ट्रीच्या बाजूने बारदाणे लावावेत व त्यावर वारंवार पाणी शिंपडावे जेणेकरून आतील तापमान कमी राहण्यास मदत होईल.तसेच पोल्ट्रीमध्ये हवा खेळती राहिल याची काळजी घ्यावी . |

| मेघदूत | दामिनी |
|---|---|
| अ‍ॅप्लिकेशन डाउनलोड करण्यासाठी स्कॅन करावे | अ‍ॅप्लिकेशन डाउनलोड करण्यासाठी स्कॅन करावे |

स्त्रोत

१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई

ठिकाण : कोल्हापूर

दि. : १७.०४.२०२६

**स्वाक्षरीत**

**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, कोल्हापूर तथा**

**सहयोगी संशोधन संचालक,**

**विभागीय कृषि संशोधन केंद्र , कोल्हापूर**